# प्रेस नोट

अॅन्टी करप्शन ब्युरो, अमरावती
दिनांक : १४/०५/२०१९

| | | |
|---|---|---|
| १ | युनिटचे नाव | अॅन्टी करप्शन ब्युरो अमरावती घटक |
| २ | आरोपीचे नाव, हुददा, वर्ग व कार्यालयाचा पत्ता | श्री.प्रमोद पुंडलीकराव लांडगे, वय ४३ वर्षे, पद : तलाठी, आपोती (बु.) अति.प्रभार : दापुरा, ता.जि.अकोला, |
| ३ | अपराध घडला तारीख व वेळ | दिनांक १४.०५.२०१९ चे १९.१५ ते १९.३० वा.दरम्यान |
| ४ | मागणी केलेली रक्कम | १५,०००/– रुपये |
| ५ | स्विकारलेली रक्कम | १५,०००/– रुपये |
| ६ | घटनास्थळ | गणराज कोल्ड्रीक्स, बस स्टॉपजवळ, करतखेड, ता.दर्यापूर, जि.अमरावती |

**थोडक्यात हकिकत** : यातील तक्रारदार यांचेकडे असलेले ट्रॅक्टरने ते मौजे कपीलेश्वर, ता.जि.अकोला येथील घाटातुन रेती वाहतुक करत असुन श्री.प्रमोद लांडगे, तलाठी यांनी तक्रारदार यांचेकडे त्यांचे ट्रॅक्टरने रेती वाहतुक करु देणेकरीता व त्यांचेविरुध्द कारवाई न करणेसाठी १५,०००/– रुपये लाचेची मागणी करीत असल्याबाबत दिनांक : ०९.०५.२०१९ रोजी प्राप्त तक्रारीवरुन दिनांक : १४.०५.२०१९ करण्यात आलेल्या पडताळणी दरम्यान नमुद आलोसे प्रमोद लांडगे, तलाठी यांनी तक्रारदार यांचेकडे पंचासमक्ष १५,०००/– रुपये लाचेची मागणी केली. त्यानंतर आयोजित सापळा कार्यवाही दरम्यान नमुद आलोसे यांनी मागणी केल्याप्रमाणे १५,०००/– रुपये लाच रक्कम स्विकारली, वरुन त्यांना रंगेहाथ पकडण्यात आले. नमूद आरोपीविरुध्द कलम ७ लाचलुचपत प्रतिबंधक कायदा १९८८ व सुधारणा कायदा २०१८ अन्वये गुन्हा नोंद करण्याची प्रक्रिया सुरु आहे.

सदरची कार्यवाही श्री.श्रीकांत धिवरे, पोलीस अधीक्षक, अॅन्टी करप्शन ब्युरो, अमरावती परिक्षेत्र, अमरावती, श्री.पंजाबराव डोंगरदिवे, अपर पोलीस अधीक्षक, अॅन्टी करप्शन ब्युरो, अमरावती परिक्षेत्र, अमरावती, श्री.गजानन पडघन, पोलीस उपअधीक्षक, अॅन्टी करप्शन ब्युरो, अमरावती यांचे मार्गदर्शनाखाली आम्ही पो.नि.दिप्ती जोशी, पो.हवा.चंद्रशेखर दहेकर, पो.कॉ.अभय वाघ, पो.कॉ.आशिष जांभोळे, म.पो.कॉ. शितल निलवर्ण तसेच चालक पो.ना.चंद्रकांत जनबंधु यांनी पार पाडली.

नागरीकांनी अशाच प्रकारे भ्रष्टाचारा संबंधी तक्रार देण्यासाठी पुढे यावे असे आवाहन करण्यात येत आहे.

**संपर्क** : अॅन्टी करप्शन ब्युरो, ललीत सेंटर, परांजपे कॉलनी, अमरावती
ऑफीस फोन नं.०७२१–२५५२३५५, २५५३०५५
टोल फ्रि नंबर –१०६४

(दिप्ती जोशी)
पोलीस निरीक्षक
अॅन्टी करप्शन ब्युरो, अमरावती

Scanned by CamScanner